या वीजवाहिन्या दुरुस्त करण



बेळगाव : बीसीए विद्यार्थ्यांसमवेत क्विकहिल फाउंडेशनचे अनुपमा काटकर व अजय शिर्के.

# दमशि मंडळ बीसीएच्या विद्यार्थ्यांची निवड

**बेळगाव : पुढारी वृत्तसेवा**

डिजिटल जगतात वाढणाऱ्या सायबर गुन्ह्यांपासून युवकांना सजग करण्यासाठी पुण्यातील 'क्विकहिल' फाउंडेशनतर्फे राबविण्यात येणाऱ्या 'सुरक्षिततेसाठी सायबर शिक्षण' या उपक्रमासाठी दमशि मंडळाच्या बीसीए कॉलेजच्या विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

सायबर सुरक्षितता, सोशल मीडिया शिस्त आणि सायबर जागरुकता यासंबंधी विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. या उपक्रमासाठी अर्पिता जाधव, यश कलकुंद्रीकर, वनिता मोदगेकर, श्रीनाथ कांबळे यांची निवड झाली आहे. विद्यार्थ्यांना प्राचार्य आनंद पाटील व शिक्षक समन्वयक वर्षा उचगावकर यांचे मार्गदर्शन लाभत आहे. क्विकहिल फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर व सहसंचालक अजय शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड करण्यात आली.